# मानसशास्त्र विभागामार्फत दिगवडे येथे मानसिक आरोग्य व लिंग फरकावर सर्व्हे




दिगवडे येथे श्रीपतराव चौगुले कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या सर्वे प्रसंगी सरदार पाटील मारुती पाटील सुरेखा जांभेलकर नंदकुमार पाटील दीपक पवार प्रा. जे. ए. सरदेसाई, डॉ. एन. डी. मांगोरे व मान्यवर

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज् माळवाडी - कोतोली येथील बी. ए. भाग तीन मधील मानसशास्त्र विभागाच्या वतीने मौजे दिगवडे येथे मानसशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात आले.

दिगवडे गावातील लिंगभेदाचा अभ्यास व मानसिक आरोग्य या संदर्भात अभ्यास करण्यात आला. बी. ए. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण केले.

यावेळी दिगवडे गावचे नागरिक व पोलीस अधिकारी सरदार पाटील , दिगवडे गावचे सरपंच मारुती पाटील, ग्रामसेविका सुरेखा जांभीलकर,पोलीस पाटील नंदकुमार पाटील, दिपक पोवार व इतर ग्राम पंचायतीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जे. ए. सरदेसाई, डॉ. एन. डी. मांगोरे यांनी केले.